**प्रकरण चौथे**

# *माळवा, गुजराथ आणि बुंदेलखंडातील मराठ्यांचा साम्राज्य विस्तार*

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून मराठ्यांनी स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर करण्याचे स्वप्न पाहण्यास सुरवात केली. व तेव्हापासून त्यांचा संपर्क माळवा, गुजराथ आणि बुंदेलखंड या प्रदेशांशी येऊ लागला. या तिन्ही प्रदेशात मराठ्यांनी साम्राज्य वृध्दीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा या प्रकरणात घेण्याचे योजिले आहे.

माळवा म्हणजे मध्य भारतातील एक सुपीक प्रदेश होय. प्राकृतिक दृष्टीने विचार करता माळवा हा सातपुडा पर्वताच्या मुख्य श्रेणीपासून उत्तरेस वाहणाऱ्या चंबळ नदी पाणलोटाचा प्रदेश होय.

माळवा पठाराच्या स्वाभाविक सिमा म्हणजे उत्तरेकडे मुकुंदवारा डोंगर रांग, पूर्वेस सागरचे पठार, दक्षिणेस विंध्य पर्वत व पश्चिमेला विंध्य पर्वतातून फुटलेली व पुढे अरवलीला मिळणारी डोंगराची रांग या होत. समुद्रसपाटी पासून सुमारे ५०० ते ६०० मीटर उंचीवर असलेल्या या प्रदेशातील जमीन सुपीक व काळी असून पठारावर पूर्व पश्चिम बेटवा, चंबळ व मही नद्यांचे भाग येतात. चंबळ ही तर या प्रदेशातील प्रसिध्द नदी. या शिवाय क्षिप्रा, कालि सिंध व पार्वती या इतरही नद्या आहेत. सरासरी ७० सें.मी. पावसाच्या प्रदेशात गहू, हरबरा, कापूस, अफू ही महत्वाची पिके घेतली जातात. [१]

अशा या सुपीक प्रदेशावर प्राचीन काळात पुष्कळ घडामोडी झाल्या. मात्र या प्रदेशावर स्वारी करणारा पहिला इस्लामी शासक म्हणजे गुलाम वंशीय अल्तमश होय. त्याने माळव्यावर हल्ला करुन १२३५ मध्ये उज्जैन शहरातील अनेक भव्य इमारती नष्ट केल्या.[२] गुलाम वंशानंतर खलजी, घोरी या घराण्यांची काही क ळ माळव्यावर अधिसत्ता होती. त्यानंतरच्या काळात सोळाव्या शतकाच्या अखेरीस अकबराने माळवा मोगली साम्राज्यास जोडला.[३]

अकबराने उज्जैन ही माळव्याची राजधानी केली. त्याकाळी माळव्यात उज्जैन, रायसेन, चंदेरी, सारंगपूर, मांडू, हंडिया, गागरौन, कोटडी, पिंडवा, बीजागढ, गढा, मंद सौर, व नंदुखार या बार जिल्ह्यांचा समावेश होता. मोगलांच्या काळात माळव्याची चांगलीच भरभराट झाली होती.[४]

छ.शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापना केली. अखेर पर्यंत त्यांना प्रथम स्वराज्य निर्मितीसाठी आणि नंतर रक्षणासाठी सातत्याने कोणाशी ना कोणाशी तरी लढावे लागले. छत्रपतींच्या काळात मराठ्यांच्या स्वराज्याच्या सीमा ४/५ जिल्ह्यांपुरत्याच मर्यादित राहिल्याने सुरतेवर स्वारी करुन एक प्रकारे गुजराथेत शिरले. मात्र माळव्यात गेले नाहीत. औरंगजेबाने त्यांना आग्र्याला अटक करवून ठेवले त्यामुळे त्यांना उत्तरेचे दर्शन झाले पण वेगळ्या प्रकारे !

मराठ्यांचे दुसरे छत्रपती तर महाराष्ट्राच्या भूमीतच मोगलांशी खुद्द औरंगजेब बादशहाशी झुंजत राहिले. नी अखेर १६८९ मध्ये त्याच औरंगजेबाच्या पाशवी आक्रमणाचे बळी ठरले.

मात्र मराठ्यांचे तिसरे छत्रपती व शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांनी स्वराज्य

विस्ताराचे स्वप्न पाहिले होते. त्यांच्या स्वप्नाचे प्रतिबिंब ४ जून १६९१ रोजी त्यांनी लिहिलेल्या हणमंतराव घोरपड्याच्या पत्रात स्पष्ट होते. त्या पत्रात ते म्हणतात, ''महाराष्ट्र धर्म रक्षावा हा तुमचा संकल्प स्वामींनी जाणून उभयतास जातीस व फौजेस सहा लक्ष होनांची नेमणूक चालविण्याचा निश्चय करुन दिधला असे. पैकी रायगड प्रांत व विजापूर, भागानगर व औरंगाबाद हे चार काबीज केल्यावर दर कामगिरीस पाऊण लाख या प्रमाणे तीन लाख व बाकीचे तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली घेतल्यावर द्यावयाचे असा निश्चय केला आहे. एकनिष्ठेने सेवा करावी, स्वामी बहुतेक प्रकारे चालवितील.[५]

तथापी मराठ्यांचा मावळ्यात प्रवेश नेमका केव्हा झाला याबद्दल वाद आहे. सर जॉन माल्कमने मराठे १६९० मध्येच माळव्यात घुसल्याचे मत दिले आहे.[६] तर सर यदुनाथ सरकारांनी फारसी बखरींच्या आधारे १६९९ मध्ये मराठे माळव्यात घुसले असे म्हटले आहे.[७]

औरंगजेबाच्या कडव्या धार्मिक धोरणाने त्याची हिंदू प्रजा आणि रजपूत राजे-रजवाडे, जमिनदार बादशाहीवर नाराज झाले आणि त्यांनी मराठ्यांशी सर्वतोपरी मिलाप केला. त्यामुळेच मराठयांना विंध्य पर्वतातील घाट आणि नर्मदेवरील उतारांची माहिती मिळून त्यांचा माळव्यात प्रवेश सुकर झाला. माळव्यात रजपूतांच्या कित्येक जहांगिऱ्या होत्या त्यांच्याशी सेन्हाचे संबंध राखल्यामुळे मराठ्यांना मावळ्यावरील आक्रमणात तेथील लोकांचे सँहाय्य झाले.[८]

राजारामाच्या काळातच मराठे १६९९ मध्येच नर्मदा पार झाले. या सुमारास बादशहा व छत्रपती या दोघांनीही परस्पर च्या प्रदेशावर मोठ्या मोहिमा उघडल्या. दोघांच्याही सेनांनी परस्परांचे प्रदेश उजाड करुन सर्वत्र घबराट माजवित होते. दसरा झाल्यावर महाराजांनी कृष्णा सावंत यांस १५००० घोडदळासह उत्तरेस स्वारीसाठी पाठविले. कृष्णा सावंताने नर्मदा पार करुन धामोनीच्या प्रदेशात स्वारी केली. मराठ्यांच्या इतिहासातील मोघली मुलखावर धाड घालणारा कृष्णा सावंत हा पहिला मराठा वीर होय.[९]

राजारामाच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने एका मागोमाग एक मराठी किल्ले सर करण्याचा सपाटा लावला. त्याच्या मोहिमेला उत्तर म्हणून बादशहाचे उत्तरेशी दळणवळण तोडावयाचे व उत्तरेतील सुभ्यातून येणारी लष्करी सामुग्री, धान्य आणि पैसा हस्तगत करावयाचा या हेतूने मराठी फौजा खानदेश, गुजरात, माळवा, या प्रांतात घुसू लागल्या. दक्षिण सुभ्यातही त्यांनी जागोजाग छावण्या घातल्या व खंडण्या वसूल करण्यास सुरुवात केली. थोडक्यात म्हणजे राजारामाच्या मृत्यूनंतर अल्पावधीतच मराठ्यांनी मोगलांची राज्ययंत्रणा खिळखिळी करुन सोडली.[१०]

१६९९ मध्ये कृष्णा सावंताप्रमाणेच काळोजी पवारही माळव्यात आला होता. त्याचा दरारा पाहून उत्तरेत त्याला काळू मराठा दख्खनवाला ही म्हण प्रचलीत झाली होती. हे येथे मुद्दाम लक्षात घ्यावयास हवे.[११]

इ.स.१७०० च्या २ किंवा ३ मार्च रोजी छत्रपती राजारामाचा मृत्यू झाला.[१२] त्यानंतर राजारामाची पत्नी ताराबाई हिने सत्तेची सर्व सूत्रे स्विकारली. त्यानंतर तीने मोगलांना त्यांच्या प्रदेशात दे माय धरणी ठाय करुन सोडण्याचे धोरण अंगीकारले. नेमके त्याच वेळेस औरंगजेबाने हट्टाला पेटून सातारा, पन्हाळगड, विशाळगड वगैरे नामांकित

किल्ले हस्तगत करण्यास सुरुवात केली. त्याने महाराष्ट्रात एकामागून एक काही किल्ले घेतले. परंतु त्याची पाठ वळताच मराठे पुन्हा आपले गेलेले गड, किल्ले हस्तगत करीत राहिले. दक्षिणेत औरंगजेबाशी मराठे वरीलप्रमाणे सामना देत असताना ते बादशाही मुलूखात उतरुन धामधूम करीत होते.[१३]

इ.स.१७०३ च्या डिसेंबरात नेमाजी शिंदे, केसोपंत पिंगळे यांनी सर्जाखानाशी लढाई करुन त्यांस कैद केले व ३ लाख रुपये दंड घेऊन सोडूनही दिले. त्यानंतर २ महिन्यांनी नेमाजी शिंदे, केसोपंत व परसोजी भोसले ५०००० स्वार घेऊन नर्मदा उतरून काळबाग पर्यंत पोहोचले. बादशहाने गाजीउद्दीनास त्यांच्यावर रवाना केले.

गाजीउद्दीनने माळव्यात कूच केले. सिरोंजजवळ त्याची नेमाजी शिंद्याशी गाठ पडली. लढाई झाली, तथापी मराठ्यांना माघार घ्यावी लागली. मराठ्यांवर विजय मिळविल्याबद्दल बादशहाने गाजीउद्दीनास सिपाह-सालार ही पदवी दिली.[१४] भिमसेन सक्सेना म्हणतो, 'खान सिरोंजजवळ आला, पण त्याने नेमाजीशी युध्द केलेच नाही. उलट त्याने नेमाजीवर मोठा विजय मिळविला असे बादशहाला मात्र कळविले.' खरी गोष्ट जेव्हा बादशहास कळली त्यावेळेस त्याने त्याला दिलेली सिपाह-सालार ही पदवी आणि बढत्या काढून घेतल्या.[१५] (मार्च १७०४)

ह्या लढाईनंतर मराठे बुंदेलखंडाच्या रोखाने जात असता गाजीउद्दीने फिरोजजंग याने पाठलाग करुन पुन्हा एकदा त्यांचा पराभव केला. मराठी फौजेत गोळा झालेली बरीच लूट त्यांनी हस्तगत केली. तथापी त्यांना विजयासाठी अनेक सैनिक खर्ची घालावे लागले. खानाच्या विजयाची वार्ता तोरण्यावर बादशहाला समजली, बादशहा खूश झाला त्याने त्याच्यावर बक्षिसांचा वर्षाव केला. खानाशी झालेल्या चकमकीनंतर नेमाजी आपल्या फौजेसह बनारसच्या प्रदेशाकडे निघाला. परंतु तिकडील जमिनीदारांनी वाट अडवल्यामुळे त्याला परतावे लागले. त्यानंतर बहुतेक मराठ्यांची फौज स्वराज्यात आली असावी.[१६] मराठ्यांच्या मोहिमेच्या काळात शाहीस्तेखानाचा पुत्र अबुनरखानहा माळव्याचा सुभेदार होता. वऱ्हाडात रुस्तुमखानास कैद करुन मराठे माळव्यांत आल्याचे समजताच अबुनरखान घाबरुन गेला. शत्रूचा प्रतिकार करण्याऐवजी त्याने पळ काढून उज्जैनच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. मांडवगडचा किल्लेदार नवाशीजखान याने मराठ्यांना तोंड देण्याची तयरी करुन खानास कुमक पाठविण्याची विनंती केली. परंतु खानाने त्याच्याकडे फक्त ६० घोडे पाठविले. सुभेदाराने असा कामचुकारपणा व भित्रेपणा दाखविल्याने नवाशीजखानाचा धीर सूटला व त्याने मांडवगडहून पळ काढून धार येथे आश्रय घेतला. बादशहाला हे समजताच त्याने त्याला बडतर्फ करुन खानदेशात पाठविले.

अशाप्रकारे मराठे माळव्यात धुमाकूळ घालत असता त्यांची दुसरी फौज हैदराबादहून पुढे होऊन मच्छलीपट्टणपर्यंत जाऊन पोहोचली होती. (फेब्रुवारी १७०४) या फौजेत १२००० घोडदळ व १०००० पायदळ होते. मच्छलीपट्टण जवळच्या पालाकोलू या ठिकाणावर मराठ्यांनी हल्ला केला व तेथून आजुबाजूच्या प्रदेशात फौजा पाठवून चौथाई सक्तीने वसूली केली. तेथील मोघल अंमलदार मराठ्यांना प्रतिकार करु शकले नाहीत. मराठ्यांच्या दृष्टीने स्वराज्यातील मोघली फौजांवर हल्ले करुन त्यांना हैराण करण्याचा काळ आता संपला होता. आता हल्ले मराठे

करीत होते. ते बादशाही मुलूखावरही तुटून पडत होते. स्वातंत्र्य युध्दाच्या या तिसऱ्या कालखंडात ताराबाईचा पवित्रा आक्रमकच होता. मराठे सर्वत्रच त्या काळात पसरले होते. त्याचे वर्णन करताना भिमसेन सक्सेना म्हणतो, ''मराठे सर्वत्र टोळ आणि मुंग्यांप्रमाणे पसरले होते.''[१७]

मराठ्यांनी माळव्यावर कब्जा मिळविण्यासाठी हे जे प्रयत्न आरंभीले होते त्याविषयी रियासतकार लिहीतात, ''२५ वर्षाच्या युध्दानुभवाने मराठ्यांच्या राजकीय आकांक्षा व आत्मप्रत्यय वाढला. तसा वास्तविक शिवाजीच्या वेळीही वाढला नव्हता. अर्थात त्यांच्या उद्योगास भरपूर क्षेत्राची गरज या वेळी विशेष निर्माण झाली. औरंगजेबाच्या उच्छेद करण्यात त्यांनी माळवा प्रांत परत आक्रमिला होता. जिंजी, तंजावरपर्यंतचे दक्षिण हिंदुस्थान त्यांनी पूर्वीच व्यापले होते. मोगलांनी दक्षिण देश जिंकण्याचे योजिले तेव्हाच माळवा हा प्रांत त्यांचा उद्योगाचा पाया बनला होता. उलटपक्षी मोगलांचे निवारण करणे असेल तर मोगलांचा हा मूळ पायाच उखडून काढला पाहिजे हे मराठ्यांनीही तितकेच ओळखले होते. पैसा फौज युध्दसामुग्री जी काही औरंगजेब दक्षिणेत आणेल ती माळव्यातून येत असता तेथेच लुटून हस्तगत करण्याचा सपाटा त्यांनी आरंभिला. म्हणून बादशहाच्या नाड्या तेथे विशेष आखडल्या गेल्या. आपल्या स्वराज्यात युध्दप्रसंग घडू न देता तो माळव्यातच उत्पन्न करणे मराठ्यांना फायदेशीर आणि अपरिहार्य होते.[१८]

दरम्यानच्या काळात माळवा प्रांताची राजकारणी दुरावस्था निर्माण झाल्याने मराठ्यांनी आपले लक्ष माळव्याकडे वळविले. इस.स.१७०८ नंतर शाहूने व त्याच्या आद्यसल्लागारांनी माळव्याकडे अथवा उत्तरेकडे लक्ष पुरविले, याचेही कारण माळवा प्रांताची दुरावस्थाच होय. बाळाजी विश्वनाथाने दिल्लीच्या स्वारीचे साहस अंगीकारले त्यात दुहेरी हेतू होता. शाहूची मातोश्री व परिवार दिल्ली येथे ओलीस होता त्यांना सोडविणे व माळव्यात आपला पाया भक्कम करणे.

इ.स.१७११ आणि १३ मध्येही मराठी फौजा माळव्यात शिरल्या आणि त्यांनी आमजेरा, वडनगर, वारवा या परगण्यातून खंडणीची वसूली केली असे जयपूर अखबारावरुन कळते. इ.स.१७१३ मध्ये जयसिंहाची माळव्याला सुभेदार म्हणून नेमणूक झाली. मराठ्यांच्या माळव्यावर स्वाऱ्या चालूच होत्या. इ.स.१७१५ च्या १/२ एप्रिलला खंडेराव दाभाडे व कान्होजी भोसले यांनी ३०००० फौजेनिशी नर्मदा ओलांडून माळव्यात प्रवेश केला. पण जयसिंगाने त्यांचा पराभव केला. मराठ्यांवर मिळविलेल्या या विजयाचे बक्षिस म्हणून बादशहाने जयसिंगाचे व त्याच्या हस्तंकाचे अभिनंदन केले. यापूर्वी मराठ्यांना माळव्यात असा अपयशाचा अनुभव कधीही आला नव्हता. जयसिंगाने माळव्याचा बंदोबस्त उत्कृष्ट केला. वरीलप्रमाणे माळव्यात जयसिंगाकडून पराभूत झालेल्या मराठ्यांनी माघार घेतली. परंतु पुढे अल्पावधीतच ते माळव्यात घुसले. इ.स.१७१७ मध्ये खंडेराव दाभाडे माळव्यात येऊन त्याने अष्टे, देवगड, सिहोर, वगैरे परगण्यातून चौथ वसूल केला. संतोजी भोसले आणि संताजी सावंत त्याला २५००० फौजेनिशी येऊन सामील झाले. संताजी भोसल्याने नर्मदा उतरुन उज्जैनला वेढा घातला. उज्जैन त्यास घेतला आले नाही. पण जयसिंगाच्या दुय्यम अधिकाऱ्यांचा मराठ्यांनी पराभव केला.

त्याचा एक अधिकारी रुपराम याला पकडून दंड केला व हंडीया परगणा मराठ्यांनी निळविला. ऑक्टोबर १७१७ मध्ये बादशहाने जयसिंगाकडून माळवा सुभा काढून घेऊन त्यावर मोहम्मद आमीनखानची नियुक्ती केली. अशाप्रकारे जयसिंगाचा हा पहिला कारभार संपला.

इ.स.१७१८ मध्ये मराठ्यांनी माळवा प्रांतात ठाणे दिले. त्यास काढून लावण्याकरिता बादशहाने महंमद आमीनखान यांची त्या प्रांतावर नेमणूक केली. पण तो लवकरच माळवा सोडून जानेवारी १७१९ मध्ये दिल्लीत गेला.

इ.स.१७१९ मध्ये दिल्लीत राज्यक्रांती घडून येऊन मराठ्यांना सनदांची प्राप्ती झाली. २० मार्च १७१९ रोजी बाळाजी विश्वनाथाने दिल्ली सोडली. जुलै १७१९ मध्ये तो सातान्यास आला आणि अल्पावधीतच २ एप्रिल १७२० त्याचा मृत्यू झाला.

बाळाजीच्या मृत्यूनंतर पेशवा पदावर शाहूने त्याचा थोरला मुलगा बाजीराव याची नेमणूक केली. पहिल्या दोन वर्षात पेशव्याने खानदेश वैजापूर, बीजागड, नेमाड या भागात मुलुखगिरी केली.

३-११-१७२२ रोजीच्या पत्रात बाजीराव उदाजी पवारास लिहीतो, ''प्रांत गुजराथ व प्रांत माळवा निमेल मोकासा हुजुरुन आम्हाकडे आहे. त्यापैकी निमे तुम्हास मोकासा सरंजाम करुन दिल्हा आहे. आमची इमारत सर्व तुम्हावरच आहे.''[१९]

पुढच्या वर्षीम्हणजे १७२३ मध्ये खुद्द पेशवा बाजीरावाच निजामाची भेट घेण्यासाठी बदकशान येथे गेला. १७२४ मध्ये पुन्हा निजाम पेशवा भेट नालछा येथे झाली. त्यानंतर पेशवा चार वर्षे माळव्यात जाऊ शकला नाही. पण त्याच्या वतीने आबाजी पंत पुरंदरे, बाजी भिवराव केसो महादेव, कृष्णाजी हरी दक्षिण माळव्यात मुलुखगिरीवर होते.

२४-५-१७२७ च्या पत्रात बाजीराव उदाजीराव पवाराची नेमणूक माळव्यातील चौथ व सरदेशमुखीच्या अधिकारावर केल्याचे त्या भागातील देशमुख देशपांडे यांना कळवितो.[२०] ऑक्टोबर १७२८ ते मे १७२९ पर्यंत पेशव्याने म्हणजे वस्तुत: पेशव्याचा भाऊ चिमाजी अप्पाने माळव्यात स्वारी करुन गिरीधर बहाद्दर व दया बहाद्दर यांचा पाडाव केला.

पेशव्याने १७२८ मध्ये माळव्यात जी स्वारी केली त्यास पेशव्यांची नेहमीप्रमाणे असलेली आर्थिक अडचण तर कारणीभूत होतीच. हे पेशव्यांच्या तत्कालीन काही पत्रावरुन स्पष्ट होते. बाजीराव चिमाजीस लिहीतो, ''येथे कर्जदारियाची व दरमाहेच्या पैकियाची ओढ सातारियास आहे. तिकडे गेलियावर आर्धा ऐवज साधेल तो हरयत्ने पाठ्वून देणे. जिकडे पैसा फारसा मिळेसा असेल तिकडे जाणे. कर्जदार आधी वारणे. लोकांस फारसा पैका फारसा न देतो तनू पोटाची राखणे.''[२१] यावर चिमाजी लिहीतो, ''सातारियास ऐवज रवाना करावयासी लिहिले. याखेरीज दुसरा निजध्यास नाही. सांप्रत उज्जैनीस आलो आहोत. येथील बोलीलागली आहे. नियेत जाहला नाही ........ पैका अनुकूल होईसा दिसतो.''[२२]

या आर्थिक कारणा पलिकडे सवाई जयसिंगास मराठ्यांनी माळव्यात स्वारी करावी असे वाटत होते. त्यासाठी

सवाई जयसिंगाने दुर्गादास नावाचा आपला घरचा माणूस मुद्दाम दक्षिणेत पाठविला व पेशवा आणि छ त्रपतीस लिहीले, ''तुमची फौज माळवियात जलदीने येते तरी पातशहा तुमचे जे मतलबी आहेती ते सर्वही करुन देतो. फौज माळव्यात येऊन धामधूम करी ते गोष्ट केली पाहिजे.''

माळव्याच्या या स्वारीची जबाबदारी पेशवा बाजीरावाने आपला भाऊ चिमाजी अप्पा याचेवर सोपविली. यावेळी आप्पा विशीच्या पुढे होतो. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे स्वत:च्या जबाबदारीवर स्वतंत्र मोहीम पार पाडण्याच्या स्थितीत होता यात शंका नाही. पेशव्याने आप्पावर माळव्याच्या स्वारीची जबाबदारी सोपविली व त्याचबरोबर त्याच्या मदतीस बाजी भिवराव, गणपतराव मेहंदळे, आबाजी मुजुमदार , अंताजी पंत फडणीस, उदाजी पवार, मल्हारजी होळकर इ. कर्ती माणसे पाठविली. शिवाय ८/१० हजाराची फौज असावी.

माळव्यात पूर्वीपासूनच वावरत असलेला उदाजी पवार चिमाजीस येऊन मिळाला. आता माळव्याचा सुभेदार गिरीधर बहाद्दर व मराठे यांचे युध्द अटळ झाले. २९-११-१७२९ रोजी आमझऱ्याचे युध्द झाले. तथापी पुरंदऱ्यांच्या मतानुसार मराठे माळव्यात उतरल्याचे पाहून आमझऱ्याचा तळ हलवून दया बहाद्द निघाला व त्याने आप्पाला गाठले व युध्दाचे तोंड लागले. अर्थात युध्दभूमी आमझरे नसून नालछी व आमझरे याच्या दरम्यान आहे.[२३]

या लढाईत सुसज्ज दया बहाद्दरचा पराभव झाला. विजयीश्रीने मराठ्यांच्या गळ्यात माळ घातली. आप्पाच्या सैन्यातील उदाजी पवार, बाजी भिवराव, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे वगैरेंनी पराक्रमाची शर्थ केली. बाजी भिवरावास गोळीची जखम झाली. तथापी या युध्दात मराठ्यांनी माळव्याचा सुभेदार गिरीधर बहाद्दर यास ठार केले. तत्कालीन कागदपत्रात गिरीधर बहाद्दर व दया बहाद्दर या युध्दात ठार झाल्याचे स्पष्ट म्हटले आहे.

''दया बहाद्दर याने चालून नेवोन बारि धरिली. मग आपण सख्ती करुन युध्द प्रसंग बरा गाठला. दया बहाद्दर व त्याचे सरदार टार झाले. लुटून फना केला.''[२४] दया बहाद्दरप्रमाणेच गिरीधर बहाद्दरासही याच लढाईत मराठ्यांनी मारले. गिरीधर बहाद्दरास उदाजी पवाराच्या हातून मरण आले. असे पुरंदरे म्हणतात. पण जगदेवराय उदाजीचा धाकटा भाऊ याने गिरीधरचे शीर उडविले असेही म्हटले आहे.

माळव्यात उरतल्यापासून उज्जनीस जावयास आप्पाला तेवीस-चोवीस दिवस लागले. यावरुन ही मोहीम एकाच लढाईने आटोपली असेलसे वाटत नाही. अमझरा ते उज्जैन यांच्या दरम्यान अनेक लढाया झाल्या असाव्यात. तथापी पुराव्याअभावी तर्कावरच विसंबून रहावे लागते.

उज्जैनीस चिमाजी अप्पा गेल्यावर त्याला पेशव्याचे पत्र आले. ''जर हे गोस्ट जाहली असली तरी उज्जनी सुभ्याचा बंदोबस्त करुन मग कोष्टीकडे पोट भरावयास असुद्या. मुलकात जाऊन फौजेची उस्तवारी करणे. उज्जनी शहराचा पैका बरा घेणे.''[२५]

चिमाजी आप्पाने माळव्याच्या या स्वारीत यश संपादन केल्याने पेशवे घराण्याचा लौकिक तर वाढलाच परंतु पेशव्याचा शाहू दरबार व दिल्लीचे बादशाहीत विशेष बोलबाला होऊ लागला. पेशव्यांवर प्रेम करणाऱ्या राजदरबारी

यांजकडून आप्पांवर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला.

धनाजी ढमढेरे व सुभानजी सेलार लिहीतात, ''गिरीधर बहाद्दर यास बुडवून यश घेतले. हे वर्तमान संतोषाचे आले. यावरुन बहुत समाधान जाहले. आपण येशस्वी आहेत. पुढेही याच प्रकारे श्री यश देईल.[२६] वरीलप्रमाणेच आप्पाचा गौरव करणारी पत्रे कृष्णराव महादेव, बाजीराव, मल्हार दादाजी, धोंडोजी महादेव, चिमणाजी दामोधर यांनी लिहीली.[२७] यश खरोखरी अभिनंदनीय होते यात शंका नाही. माळव्याचा सुभेदार व त्याचा सेनापती लोळवला जाऊन त्याची सर्व सलतनत मराठ्यास मिळून मराठी भाल्याचा तीक्ष्णपणा उत्तर हिंदुस्थानात गाजला गेला. मोगल मराठ्यात यापूर्वी अनेक अद्‌भूत संग्राम झाले व त्यात मी-मी म्हणविणारे मोगल सेनानी धुळीला मिळविले. पण यावेळी ते स्वदेशात असून त्यांना युध्दभूमीची खडान्‌खडा माहिती होती. पण यावेळी ते परदेशात शत्रुच्या मुलुखात असून अनेक अडचणींवर मात करत होते. मोगल बादशाहीला हादरा बसला. तथापी आप्पाच्या स्वारीचे दुय्यम उद्दीष्ट जे पैका मिळवून दारातील सावकारी धरणेकरी उठविणे बहुधा फारसे साधले नसावे.[२८]

माळव्यात मराठ्यांनी यश मिळविले. परंतु आपापसात त्यांना माळव्यात ३ वाटे हवे होते. अन्यथा अडचणी निर्माण होतील हे स्पष्ट करणारे एक पत्र अप्रकाशित याविषयी बोलके ठरते.

''श्रीमंत आपा स्वामीचे सेवेसी वि.सेवक कृष्णाजी हरी कृ.सा.न.वि. स्वामीचे कृपे दृष्टी करुन तागाईत का.वद्य सप्तमीपर्यंत सेवकाचे वर्तमान येथोस्थित असे. स्वामीची आज्ञा घेऊन राबोस (?) रा.म्हल्हारजी होळकर यांची भेटी घेऊन सिनरास आलो. अलिकडे वर्तमान परस्पर ऐकिलो की, पवारांची समजावीसी झाली. ते मालवियात या समागम जातात म्हणून वर्तमान ऐकिले. त्यीस ते ती जाईचे विभागी या निमित्त आमचेविषयी त्यास पत्र असले पाहिजे. आमचेविषयी त्यांसी (शिंदे/होळकर यांना) पत्र द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. स्वामीचे आज्ञेप्रमाणे मालवियात जातो. पुढे तरी स्वामीने आमचा अभिमान धरुन जेणेकरुन आमचे उर्जित घेऊन एकवेळ कर्जमुक्त होऊ ती गोष्ट केली पाहिजे.''[२९]

गिरधर बहाद्दर मेल्यामुळे दिल्लीच्या बादशहाने माळव्याच्या सुभेदारीवर त्याचा मुलगा भवानीराम याची नेमणूक केली. आप्पा स्वारी संपवून पुण्यास गेले. १७२९ च्या पावसाळ्यात दोघेही भाऊ सातार्‍यास शाहू महाराजांच्या दर्शनास गेले. तरी मागे त्यांनी छावणीला मल्हारराव होळकरांस ठेवले होते. माळव्याचा लढा चालूच होता. तेथले नाक मांडवगडचा किल्ला अद्याप मराठ्यांच्या हाती आला नव्हता. सुभेदार भवानीराम याचा सवाई जयसिंग व सैद अज्ञमुदी अल्लीखान यांनी पाठपुरावा करावा असा बादशहाचा हुकूम होता. परंतु माळव्याच्या सुभेदारीवर या दोघांचा डोळा असल्याने त्यांनी भवानीरामास मदत तर केली नाहीच उलट ते मराठ्यांचे पक्षपाती असल्याने त्यांनी त्याच्या कारभारात विघ्नेच उत्पन्न केली. एकंदरीत भवानीरामचा जम न बसता, त्याची फटफजिती झाली व तो केवळ एक वर्षातच पद्‌भ्रष्ट झाला व सुभेदारीची माळ पुन्हा सवाई जयसिंगराच्या गळ्यात पडली. तथापी पुढे अल्पावधीतच बादशहाने महंमदखान बंगश यास माळव्याचा सुभेदार म्हणून नेमले.

१७३० च्या नोव्हेंबरास पैशाची तरतूद करुन फौज जमवून बंगशने आग्रा सोडले व माळव्यात शिरताच त्याने मराठ्यांविरुध्द मोहीम सुरु केली. २७-१-१७३१ ला मल्हारराव होळकराची शहाजहानपूर नजीक गाठ पडून लढाई झाली. २५-२-३१ ला पुन्हा धारनजीक मराठ्यांची बंगशबरोबर चकमक उडून मराठ्यांना मागे हटावे लागले. याप्रमाणे १७३१ मध्ये मराठ्यांची पिछेहाटच होत गेली. त्यांनी आतापर्यंत माळव्यातील काबीज केलेल्या ठाण्यांपैकी उज्जैन, धार, मांडू इत्यादी ठाणी त्यांना सोडून द्यावी लागली. इतकेच नव्हे तर नर्मदेच्या उत्तरतीरी त्यांनी बांधलेले बहुतेक किल्लेसुध्दा बंगशने काबिज केले.

तथापी अल्पावधीतच १७३१ च्या हिवाळ्याच्या सुरुवातीस मराठी फौजांनी पुन्हा एकदा नर्मदा ओलांडली. सुभेदाराच्या (महंमदखान बंगश) मदतीस जावून स्वत:ची खराबी करुन घेण्यापेक्षा मराठ्यांना पैसा देऊन आपला बचाव करणे, माळव्यातील जमिनदारांना जास्त सुरक्षितपणाचे वाटले. माळव्यात मराठी फौजा चौफेर वावरत असल्यामुळे खजिना रिकामा पडत चालला. सुभ्यातील छोटे छोटे संस्थानिक, राजेरजवाडे, जमीनदार उघड-उघड रितीने मराठ्यांना सामील झाले. दिल्लीहून कुमक आल्याशिवाय मराठ्यांचा प्रतिकार आपल्या हातून शक्य नाही, असे बंगशने लिहून कळविताच त्याला परत बोलावून मराठ्यांच्या हालचालीस पायबंद घालण्याचे बादशहाने ठरवून मराठ्यांशी सलुख्याने राहू इच्छिणाऱ्या सवाई जयसिंगास माळव्याची सुभेदारी पुन्हा सन १७३२ मध्ये दिली. दिल्ली दरबारने माळव्याच्या सुभेदारीवर दुसऱ्यांदा जयसिंगाची नेमणूक केल्याने व दरम्यान मराठ्यांची तृष्णा वाढल्याने जर आपण जयसिंगास प्रतिबंध केला नाहीत तर आपले तेथील स्थान ढळल्यावाचून राहणार नाही अशी मराठ्यांची भितीही रास्तच होती कारण दिल्ली दरबारने मराठ्यांच्या बंदोबस्तकारिता त्याची या जागी नेमणूक केली होती. त्याने अधिकार ग्रहण केल्याबरोबर चढाईचे धोरण स्विकारुन दक्षिणेत फौजा पाठविण्याचा विचार केला. या जयसिंगाच्या हालचालीची बातमी येताच शाहू दरबारात चलबिचल सुरु झाली. जिकडे ज्यांचे हिसंबंध तिकडील भानगडीत त्याने प्रथम लक्ष घालणे जरुर होते. माळव्यात गडबड होते आहे तेव्हा तिकडील बंदोबस्त करण्याची जबाबदारी पेशव्यावर येऊन पडली व १७३२ सालच्या विजयादशमीच्या नंतर आप्पा उत्तरेच्या स्वारीकरिता डेरेदाखल होऊन मार्ग क्रमू लागला. आप्पा खानदेशात गेल्यावर त्यास छत्रपती कडून पत्र आले, ''सांप्रत उत्तरेकडील फौजांचा चळचळाट दक्षण प्रांतास यावयाचे उद्देशेजाला आहे म्हणून तत्वत: वर्तमान लिहिले आहे. ऐशास तुम्ही त्या प्रांते जात आहा, तिकडील खबर तुम्हांकडे येत असले, परंतु तुम्हांस कलावे तुम्ही सावध असावे यास्तव हे आज्ञापत्र सादर केले आहे. तरी उत्तरेकडील बातमी चौकस राखोन जो मनसुबा कर्तव्य तो विचारे करुन करणे''.[३०]

खानदेशात शिरल्यावर आपल्या फौजेचे चिमाजी आप्पाने दोन विभाग केले. मल्हारजी होळकर आणि राणोजी शिंदे यांनी गुजराथेतील कामिगीरी करुन माळव्यात उतरावे आणि खुद्द चिमाजीने नेमाडातून माळव्यात यावे अशी ही योजना होती. या योजनेनुसार दोन वाटेने आप्पांची फौज चालू लागली.

वाटेत चिमाजीने मानाजी जाधवाच्या जहांगीरीत धुमाकूळ घातला. परिणामी रागाने त्याने चिमाजी विरुध्द

छत्रपतींकडे तक्रार केली. [३१]

अशाप्रकारे १७३२ पासून मराठ्यांचे माळव्यातील आक्रमण दोन दिशांनी चाले. शिंदे होळकरांच्या हाताखालीलफौजा गुजरात मार्गे पश्चिम माळव्यात शिरत दुसरी ईशान्य दिशेने बुंदेलखंडात जाऊन बुंदेल्यांची मदत घेऊन ग्वाल्हेरपर्यंतचा मुलुख उध्वस्त करीत.

इ.स. १७३३ मध्ये मंदसोरजवळ सवाई जयसिंग आणि मराठी फौज यांचे युध्द झाले. जयसिंग पराभूत झाला. पण दरम्यान मराठ्यांच्यात फूट दिसू लागली उदाजी व कृष्णाजी पवारांनी सवाईजीकडे बोली लाऊन त्याजकडे जाण्याची सिध्दता केली होती; परंतु भले लोक मध्यस्त होऊन पवारास पुनित केले व तो प्रसंग टळला. [३२]

१७३४ मध्ये मराठ्यांनी बुंदीवर हल्ला करुन जयसिंगाने गादीवर बसविलेल्या दलेलसिंगास हुसकावून बुधसिंगास गादी मिळवून दिली. अशाप्रकारे मराठ्यांनी राजस्थानच्या राजकारणात प्रवेश केला.

१७३४ चा पावसाळा संपताच आपला जरब मोगलांना दाखविण्याकरिता शिंदे, होळकरांनी माळावा, बुंदी, कोटा, अहारवाडा, या मुलखात झपाट्याने खंडण्या घेण्याची सुरवात केली. त्यास दाबण्याकरिता मीरबक्षीखान दिल्लीतून बाहेर पडला. त्याने मारवाडातील राजेरजवाडे सामील करुन घेतले. प्रचंड सेना घेऊन तो निघाला समोरासमोरील लढाईत आपला निभाव लागणार नाही हे ओळखून शिंदे होळकरांनी मुकुंददरा नदीच्या पिछाडीकडून मोगलांचा नाश चालविला. त्यामुळे मीरबक्षीस मिळालेले संस्थानिक त्यास सोडून येऊ लागले. अशा परिस्थितीत त्याने जयसिंगाच्या मध्यस्तीने माळव्याच्या चौथाईबद्दल २३ लाख रुपये मराठ्यांना देण्याचे मान्य केले. शिंदे होळकर जुलै १७३५ मध्ये पुण्यास आले. [३३] तथापी, पुढे अल्पावधीतच निजामाने माळावा सुभा आपल्या मुलाच्या नावे करुन घेऊन एक प्रकारे पेशव्यास आव्हानच दिले.

पावसाळा संपताच (१७३५) तीस हजार उत्कृष्ट सैन्य घेऊन निजाम माळाव्याच्या रोखे वाट चालू लागला. त्याने बुंदेलखंडातून माळव्यावर चढाई केली. १२-११-१७३७ रोजी निजामाचा धामोणी येथे मुक्काम झाला. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात तो भोपाळनजीक आला. त्याने भोपाळच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. १५-१२-१७३७ पेशव्याने मोगली फौजेवर हल्ला चढविला व विजय संपादन केला.

७-१-१७३८ रोजी दोरहा सराई करारानुसार माळाव्याची सनद पेशव्याने मिळविली. [३४] शिवाय नर्मदा व यमुना यामधील मुलुख व युध्दखर्च म्हणून ५० लाख रुपये मिळविले. तथापी उपरोक्त करार बाजीराव पेशव्यांच्या ह्यातीत अमलात आणला गेला नाही तर पुढे चौदा वर्षांनी १७४३ मध्ये बादशहाने त्याला राजरोस मान्यता दिली.

डॉ.दिघे यांच्या मतानुसार भोपाळ विजय उत्तरेस स्थापन होत चाललेल्या मराठी साम्राज्याचा पहिला जाहीरनामा होय. [३५] भले माळाव्याच्या सनदा नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठ्यांना प्राप्त झालेल्या असतील पण वरील करारानंतर माळाव्यावर दिल्लीहून नवीन सुभेदाराची नेमणूक न होता माळावा सुभा मराठी अमलाखाली राहिला. व राजारामाच्या कारकिर्दीत माळाव्यावर सुरु झालेल्या स्वाऱ्यांचा प्रदेश विस्ताराच्या दृष्टीने बाजीरावाच्या काळातच

यशस्वी शेवट झाला, असेच म्हटले पाहिजे.

**गुजरात :-**

कच्छ, सौराष्ट्र (काठेवाड) व गुजरात हे प्रदेश मिळून सध्याचे गुजरात राज्य बनले आहे. याच्या वायव्येस पाक, उत्तरेस व ईशान्येस राजस्थान, पूर्वेस माळवा व धुळे जिल्हा (महाराष्ट्र) आणि पश्चिमेस अरबी सागर आहे.

या प्रदेशाचे तीन नैसर्गिक प्रदेश आहेत. किनाऱ्याजवळचा प्रदेश रेती व लवणे यांनी व्यापलेला आहे. दक्षिणेकडील भागात दलदल पसरलेली आहे. या भागात गवत चांगले वाढते आणि उस व कापूस ही पिकेही भरघोस येतात. एक हजार मैल लांबीचा समुद्र किनारा लाभला असून प्राचीन काळी या बंदरातून दूर देशी मोठा व्यापार चालत असे. २) हा विभाग मैदानी प्रदेशाचा आहे. हा दक्षिणेकडे सुरतेजवळ फक्त १५ मैल रुंद आहे, पण उत्तरेकडे हळूहळू वाढत जाते. हा सपाट भू-भाग साबरमती, मही, बनारस, सरस्वती, नर्मदा व तापी या नद्यांमुळे फार सुपीक बनलेला आहे. शिवाय मच्छू, भादर, शेनुंजी , दमणगंगा या लहान नद्यांनीही गुजरातला समृध्द केले आहे. ३) अरवली, विंध्य, सातपुडा व सह्याद्री यांच्या रांगा या भागात येतात. या पर्वताच्या कुशीतून वाहणारे असंख्य जलौघ गुजरात मधील नद्यांना जलप्रदान करतात. या भागात विपुल झाडी व अनेक दुर्गम गिरीशिखरे आहेत.

गुजरातम्ध्ये सर्वसाधारणपणे ७५ ते १२५ सें.मी. पाऊस पडतो. प्रदेश कृषी प्रधान असून गहू, तांदूळ, ज्वारी व कापूस ही इथली मुख्य पिके होत. खनिज संपत्तीही या प्रदेशात विपुल प्रमाणात सापडते.[३६]

अशा या संपन्न प्रदेशात प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंत बरा वाईट इतिहास घडत आला आहे.

इ.स.१३०० पर्यंत गुजरातमध्ये हिंदू राजवट होती. तथापी त्यावर्षी अल्लाउद्दीन खिलजीने ती संपुष्टात आणली त्यानंतर सुमारे ४०० वर्षे मुसलमानी अंमल गुजरातवर होता.

१५७३ मध्ये अकबराने गुजरात जिंकून तो मोगल राज्याचा एक सुभा बनवला. तेव्हापासून सुमारे १८५ वर्षे राजघराण्यातील सुभेदार आणि ठाणेदार यांच्यामार्फत गुजरातवर मोगलांचे राज्य होते.[३७] याच कालखंडात इ.स.१५०० नंतर पोर्तुगीज लोकांनी गुजरातच्या किनाऱ्यावरील दीव, दमण वगैरे ठाणी काबीज केली.
अशा या गुजरातशी मराठ्यांचा संबंध स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासूनच आला.

महाराजांचा गुजरातशी संबंध म्हणजे त्यांनी केलेली सुरतेची लूट होय. ही लूट जाने. ६ ते १०, १६६४ मध्ये महाराजांनी केली. अर्थात महाराजांनी सुरतेवर जो हल्ला केला त्याला खरे म्हणजे लूट म्हणण्याऐवजी सुरतेवरची स्वारी म्हणणे जास्त संयुक्तिक होईल. महाराज सुरतेवरच का घसरले, याची कारणे देताना आपल्याला असे सांगता येईल की, त्यांना औरंगजेबावर सूड उगवायचा होता तसेच मोगलांनी मराठ्यांवर जे युध्दलादले होते त्याचा खर्च भरुन काढावयाचा होता व त्यासाठी सुरत हेच योग्य ठिकाण होते. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे सुरत हे श्रीमंत शहर होते. पण त्यास भक्कम तटबंदी नव्हती. ही सर्व माहिती महाराजांनीअचूक मिळविली आणि सुरतेवर मोहिम काढली. १ जाने. १६६४ रोजी सुरत स्वारीकरिता त्यांनी नाशिक सोडले आणि ५ जानेवारी रोजी ते सुरतपासून अवघ्या २८

मैलावर असलेल्या गणदेवी या ठिकाणी आले. व तेथे आल्याबरोबर महाराजांनी आपले दूत सुरतेचा सुभेदार इनायतखान व इतर व्यापारी यांच्याकडे पाठविले व खंडणीची मागणी केली. ती इनायतखानाने धुडकावून लावल्यामुळे महाराजांनीसैनिकांना सुरत लूटीची आज्ञा केली. मराठ्यांनी ६ ते १० जानेवारी अशी चार दिवस मन मानेल तसे शहर लुटले मराठे सुरत लुटत असता इनायत खानाने किल्ल्यातून तोफांची मारगीरी सुरु केली. परंतु त्यामुळे मराठ्यांचे फारसे नुकसान न होता, शहरातील घरेच नष्ट झाली.

या सुरत लुटीत महाराजांना नेमकी किती लूट मिळाली याविषयी मतभिन्नता आढळते परंतु सर्वसाधारणपणे १ कोटी रुपये मिळाले असावेत. रियासतकार लिहितात, प्राचीन काळापासून संपत्तीचे माहेरघर असे ते दोन लाख अठरा पगड वस्तीचे शहर मोगली फौजेस दाद लागण्यापूर्वीच शिवाजीने सावकाशपणे पाच दिवसपर्यंत लुटून सुमारे पाऊण कोटीची मत्ता लांबविली.

वा.सि.बेंद्रे यांच्या मतानुसार या लुटीमुळे मोगल व आदिलशहाबरोबर झालेल्या झगड्याचा खर्च वसूल झाला. शिवाय पुढील एक-दोन वर्षाच्या खर्चालाही साह्य झाले.[३९]

प्रस्तुत प्रकरणाच्या संदर्भात विचार करता शिवाजी महाराजांच्या सुरत स्वारीचे महत्व म्हणजे मोगलांच्या गुजरात सुभ्यात मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराच्या दृष्टीने पाया घातला गेला हेच होय.

सुरत प्रकरणावर मत व्यक्त करताना सेतुमाधवराव पगडी म्हणतात,''महाराजांचे ते कर्तृत्व (सुरत स्वारी) पाहिल्यानंतर मन थक्क होते. म्हणजे असा एखादा मनुष्य होऊन गेला अशी कल्पना करणेसुध्दा अशक्य होते. आईनस्टाईनने जसे महात्मा गांधीच्याबद्दल उद्गार काढले आहेत. "Coming Generation will refuse to believe that such a man walked on the earth" त्याप्रकारे महाराजांबद्दल म्हणावेसे वाटते.[४०] तथापी, राजकीय दृष्टीने विचार करता डॉ.जयासिंगराव पवारांचे मत जास्त पटण्यासारखे वाटते. ते म्हणतात,''या प्रसंगाचे महत्व केवळ संपत्तीच्या संख्येत नव्हते तर मोगलांच्या बेईज्जतीत होते. पश्चिम किनाऱ्यावरील अत्यंत संपन्न शहर लुटून महाराजांनी औरंगजेबाची बेईज्जत केली होती व त्याचबरोबर आपली इज्जत वाढविली होती. यामध्येच या स्वारीचे खरे महत्व आहे.''[४१]

१६७० च्या ऑक्टोबर महिन्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी पुन्हा सुरतेवर स्वारी केली. ती सुरतेची दुसरी लूट म्हणून इतिहासात ओळखली जाते. ३ ऑक्टोबर, १६७० रोजी महाराज १५ हजार घोडदळानिशी सुरतेसमोर आले आणि सतत ३ दिवस ते शहर जाळून लुटून घेतले. महाराजांनी युरोपियन व्यापाऱ्यांना थोडाही त्रास दिला नाही. त्यानी महाराजांना भेटी दिल्या. तिसरे दिवशी मोगली फौजा सुरतेच्या बचावासाठी येते आहे, असे समजताच महाराजांनी सुरत सोडली. जाताना सुरतकरांनी प्रतिवर्षी १२ लाख रुपये खंडणी द्यावी, नाहीतर अशीच लूट करु, अशी धमकी त्यांना दिली. एकंदर ६६ लाखच लूट त्यांना मिळाली. परतीच्या वाटेवर मात्र त्यांना दाऊदखान कुरेशीबरोबर लढा द्यावा लागला. त्यांनी तो यशस्वीपणे दिला. त्याचा पराभव केला. महाराजांना चार हजार घोडी

मिळाली. त्याचे अनेक अधिकारी कैद झाले. त्यांना पुढे महाराजांनी सोडून दिले. महाराजांच्या या दुसऱ्या सुरत लुटीने मात्र सुरतेचे महत्व झपाट्याने लयाला गेले. यानंतर महाराजांच्या स्वारीच्या बातम्या सुरतेतच वारंवार येत व तेथे मोठी घबराट निर्माण होई. परंतु महाराजांनी पुन्हा सुरतेची लुट केली नाही. तथापी शिवाजीच्या काळात सन १६६४-१६८० दरम्यान मराठी सैन्य गुजरातेत सारखे फिरत होते. व आपला दरारा गाजवत होते.[४२]

मराठ्यांचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज ह्यांना दक्षिणेतच औरंगजेबाच्या तुफानी हल्ल्यांना तोंड द्यावे लागले. अशा परिस्थितीत ते बाह्य प्रदेशात कशी आक्रमणे करणार? तथापी ऑक्टोबर १६८० मध्ये संभाजी महाराजांच्या एका फौजेने सुरतेकडे रोख धरला होता. पण अचानक मराठ्यांनी सुरतेऐवजी बऱ्हाणपुरवर आपला मोर्चा वळविला. हंबीरराव मोहित्यांनी ३ दिवस बऱ्हाणपुर लुटले. पुढे संभाजी महाराजांना आपल्या मृत्यूपर्यंत म्हणजे १६८९ पर्यंत फिरुन गुजरातकडे वळता आले नाही. छत्रपती संभाजी नंतर मराठ्यांचे छत्रपती म्हणून गादीवर आलेल्या राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील बराच काळ कर्नाटकात जिंजी येथेच व्यतीत झाला. मात्र १६९९ मध्ये त्यांची तेथून सुटका झाल्यानंतर त्यांनी मोगली प्रदेशात प्रवेश केला. नंदुरबार व त्यालगतचे प्रदेशात मराठ्यांनी सधन व्यापाऱ्यांची लूट केली. सन १६९९ मध्ये राजारामाने सुरतेकडे रोख धरिला. परंतु ही बातमी मोगलास लागल्याने बेदरबख्त, चीन किलीजखान, झुल्फिकारखान हे त्याचे पाठलागावर दौडत आले. परिंडयाजवळ बेदरबख्तखानाबरोबर मराठ्यांची चकमक झाली. मराठे परत नगरला आले (१३-११-१६९९) मराठे खानदेशात शिरणार होते. मात्र मोगलांनी तिकडूनही त्यांना प्रतिकार केला. मात्र काही थोड्या टोळ्या उतरुन थेट नर्मदा पार झाल्या. परंतु मराठ्यांचे सैन्य फाकले गेले. धनाजी जाधव व राणोजी घोरपडे यांची आणि हमीदुद्दीनखानाची गाठ कऱ्हाडजवळ पडून मोठे रणकंदन झाले. हमीदुद्दीनचा पराभव झाला (२१-१२-१६९९) धनाजीच्या हाताखालील दादो मल्हार या ब्राम्हण सरदाराने विशेष बहादुरी दाखविली.

## ताराबाईच्या काळातील गुजराथमधील साम्राज्यविस्तार –

राजारामाची विधवा पत्नी ताराबाई हिने सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर १७०२ पासून मराठी साम्राज्य विस्तारासाठी आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येते. त्यावर्षी पासून मराठे मराठे माळवा, आंध्र कर्नाटक, तामीळनाडू याप्रमाणे गुजरातमध्येही धाडशी आक्रमणे करु लागले. मुघल बादशहा स्वराज्यातील किल्ले घेण्याच्या उद्योगात गुंतला असता, त्याच्या साम्राज्याच्या इतर सुभ्यांवर स्वाऱ्या योजून त्या यशस्वी करण्याचे ताराबाईचे धोरण अत्यंत मुत्सद्देगीरीचे होते.

ताराबाई काळात माळव्याप्रमाणे मराठ्यांनी गुजरातवर स्वारी केली. नेमाजी शिंदे आपल्या फौजेसह माळव्यात शिरला असता मरठ्यांची एक तीस हजारांची फौज खानदेशमार्गे तापीच्या खोऱ्यातून कूच करुन सुरतेजवळ येऊन थडकली. (जाने.फेब्रु. १७०३) यावेळी सुरतेमधील इंग्रज वखारवाल्यांनी आपल्या वखारीची संरक्षण व्यवस्थाही

केली होती. परंतु मराठे सुरतेवर घसरले नाहीत. त्यांनी सुरतेच्या परिसरातील गावे जाळली व ते परत फिरले. त्यांना हुसकावून लावण्यासाठी मोगलांचा नसरुल्लाखान हा सरदार पाच हजार फौजेसह सुरतेकडे आला. परंतु त्याचा मराठ्यांशी सामना घडून आला नाही.[४३] मात्र गुजरातच्या संदर्भात औरंगजेबाचा मृत्यू जवळ आलेला असताना व त्याचबरोबर मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द संपुष्टात येत असताना मराठ्यांनी गुजरातच्या सुभ्यात धमाल उडवून दिली.

आपल्या पित्याचा मृत्यू जवळ ठेपला आहे हे जाणून गुजरातच्या सुभ्यावर असणाऱ्या शहाजादा महंमद आज्जमने आपणास अहमदनगरकडे भेटीस येऊ द्यावे, म्हणून बादशहाकडे सारखी विनंतीपत्रे पाठविण्यास सुरवात केली होती. बापाच्या मृत्यूच्या वेळेस आपण त्याच्याजवळ असल्यास आपणास सत्ता काबीज करणे सोपे जाईल असे त्यास वाटत होते. बादशहाने प्रथम भेटीची परवानगी नाकारली, परंतु वारंवार विनंती केल्यामुळे तशी परवानगी शहाजाद्याला मिळाली. २५-११-१७०५ रोजी त्याने अहमदाबाद सोडले. परंतु १७०५ नोव्हेंबर ते १७०६ जुलै या काळात गुजरातच्या सुभेदारीची जागा रिकामी राहिली.[४४] ताराबाईंनी या सर्व राजकीय घडामोडींची वित्तंबातमी होती. त्यांनी गुजरातमधील परिस्थितीचा फायदा उठविण्याचे ठरविले. १७०६ च्या फेब्रुवारीच्या सुमारास धनाजी जाधव व नेमाजी शिंदे यांच्या फौजा ताराबाईंनी बादशाही छावणीवर पाठविल्या होत्या त्याच फौजा धनाजींच्या नेतृत्वाखाली त्यांनी गुजरातेत घुसविल्या.[४५] त्यावेळी मराठ्यांची लष्करसंख्या पंधरा सोळा हजार किंवा चाळीस हजार असावी. मराठे प्रथम सुरतेच्या प्रदेशावर घसरले. सुरतेची उपनगरे आणि भोवतालचा प्रदेश त्यांनी लुटला. अल्पावधीतच त्यांनी बडोदाही जिंकले. तेथून ते नर्मदेच्या तिरावर आले. तेव्हा गुजरात मधील काही मोगल अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन मराठ्यांवर चाल करण्याचे ठरविले. ही बातमी मराठ्यांना समजताच मराठ्यांनीच त्यांच्यावर तुफानी हल्ले चढविले. व मोगली सैन्याची दाणादाण उडविली. मोगली सैन्यावर हा प्रचंड विजय मिळविल्यावर मराठ्यांनी पुन्हा उत्तरेकडे कूच केले व अहमदाबाद शहरावर आक्रमण केले व तेथे बरीच लूट केली. गुजरातच्या सुभ्यातील लूट आणि कैद मोगल अधिकारी यांसह मराठे सैन्य स्वराज्यात परतले. ताराबाईंनी या मोगल अधिकाऱ्यांच्या सुटकेसाठी आठ लाख रुपयांची मागणी केली. बहुतेक बादशहाने ही रक्कम भरुन आपल्या अधिकाऱ्यांची सुटका केली असावी.

ताराबाईचे युध्द प्रयत्न महत्त्वाचे आहेत. त्या बादशहाने वेढा दिलेले किल्ले त्वेषाने लढवित होत्याच शिवाय मोगली प्रदेशावर मोहिमा काढीत होत्या. धनाजी जाधव, हिंदुराव घोरपडे, राणोजी घोरपडे, नेमाजी शिंदे, केसो त्रिमल, परसोजी भोसले, कृष्णा सावंत, हणमंतराव निंबाळकर इत्यादी सेनानींच्या हाताखाली मोठ मोठी सैन्ये देऊन मोगलांच्या गुजरात, माळवा, तेलंगण व कर्नाटक या प्रदेशात ताराबाईंनी लष्करी मोहिमा काढल्या परिणामी मराठ्यांच्या एकेका किल्ल्यांच्या पायथ्याशी बादशहा चार पाच महिने वेढा घालून बसला असता, मराठ्यांचे लष्कर मात्र मोगलांच्या सधन व सुस्थिर सुभ्यात धुमाकूळ माजवीत होती. आता मराठे आक्रमक बनले होते आणि मोगली सुभेदारांवर बचावात्मक लढाया खेळण्याची पाळी आली होती.

बादशहाचा अंत जवळ आला होता. तथापी तो युध्द तहकुबीची भाषा करत नव्हता. पण मराठी फौजांना

पायबंद घालण्याचे सामर्थ्य मोगली फौजात उरले नव्हते. खुद्द बादशहा असहाय्य झाला होता. ताराबाईंनी बादशहाच्या असहाय्य परिस्थितीचा पूर्ण फायदा उठविला. त्यांनी मोठ्या जोमाने आपल्या फौजा अनेक सुभ्यात घुसविल्या. गुजरात, माळवा, तेलंगण, कर्नाटक या प्रदेशात मराठे राजरोसपणे मोहिमा काढू लागले. अहमदाबाद सुरत बडोदे इत्यादी सधन शहरे त्यांनी लुटली. अनेक सेनानींना त्यांनी धूळ चारली. अनेकांना कैद केले. प्रचंड लूट करुन मोगली सुभ्यात घबराट निर्माण केली. मराठ्यांच्या अंगी असणाऱ्या शौर्य पराक्रमादि गुणांना त्यांनी उत्तेजन देऊन मोगली मुलखात त्यांना धाडून तेथे धामधूम माजविली. महाराष्ट्राबाहेर मराठ्यांनी काढलेल्या मोहीमांमुळे मराठ्यांचे नितीधैर्य वाढले तर मोगलांचे खचले. या नीतीधैर्याच्या जोरावरच पुढेमराठ्यांनी अर्धशतकभर हिंदुस्थानवर अधिसत्ता निर्माण केली. तिची बीजे ताराबाईच्या आक्रमक लष्करी मोहीमांत आढळून येतात. मोगली सुभ्यात धुमाकूळ घालणारे मराठे हळूहळू तेथे आपले बस्तान बसवू लागले. अशाप्रकारे मराठ्यांच्या अधीसत्तेचा उदय ताराबाई कालातच घडून आला.

तथापी ८-५-१७०८ रोजी शाहूची सुटका झाली. व राजकारणाचे सर्व रंगच बदलले. पुढचा मराठ्यांच्या राज्यविस्ताराचा इतिहास शाहू आणि त्याचे पेशवे यांच्याशीच निगडीत आहे. पुढे मराठ्यांनी गुजरातवर ज्या धडका मारल्या व तेथे जे यशापयश मिळविले त्याचे धनी अर्थातच शाहू आणि विशेषत: पहिले दोन पेशवेच.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांना चारी दिशा मोकळ्या झाल्या होत्या. बाळाजी विश्वनाथाच्या नेतृत्वाखाली मराठे गुजराथेत घुसले. झबुर्आ, गोध्रा शहरावरुन मुसंडी मारत मराठे अहमदाबादेवर चाल करुन आले. अहमदाबादचा सुभेदार इब्राहिम त्यावेळी घाबरला. शहरातील गरीब व श्रीमंत व्यापारी वर्गाची त्यावेळी तिरपीट उडाली. शहर रक्षण करणे कठीण होऊन बसले. तेव्हा शहराच्या रक्षणाकरिता मराठे मागतील ते पैसे मराठ्यांना देऊन त्यांचा हल्ला परतविणे श्रेयस्कर असा विचार करुन इब्राहिमने मराठ्यांना दोन लक्ष दहा हजार रुपये खंडणी दिली.[४६] मराठे अहमदाबादेवरुन परतले. या स्वारीमुळे बाळाजी विश्वनाथाच्या लढाऊ शक्तीची कल्पना प्रथमच दृष्टीस पडते. त्यांच्याकडे आघाडीच्या कुशल सेनापतीचे गुण होते तशीच माणसांची चांगली पारख होती असेही म्हणावे लागते.

एवढी एक स्वारी सोडता बाळाजी विश्वनाथाने गुजराथवर फिरुन पेशवा या नात्याने आक्रमण केल्याचे दिसत नाही. तथापी इ.स. १७१७ मध्ये म्हणजे बाळाजी विश्वनाथाच्या पेशवे पदाच्या काळातच गुजराथ मराठ्यांच्या ताब्यात आला. तथापी गुजरातमध्ये आपापसात तंटे बखेडेही खूप झाले.

गुजराथेत शाहूच्या सरदारांपैकी बांडे, दाभाडे, गाईकवाड व चिमणाजी बल्लाळ ह्यांचे संबंध निगडीत झाले होते. ही मंडळी आपला प्रदेश व आपल्या उत्पन्नाच्या इतर बाबी खेळीमेळीने वसूल करीत नसून ते त्याकरिता आपापसात हरदम झगडत एवंच एकाच मध्यवर्ती सत्तेचे घटक आपापसात भांडत असत.

गुजराथेतील पेटलादवर चिमाजी आप्पाने सप्टेंबर १७२९ ते ३० जुलै या काळात स्वारी केली. तिथून खंडणी मिळविली. तथापी तेथे मुसलमानांशी लढण्याऐवजी आप्पा स्वपक्षीयांशीच म्हणजेच कंठाजी कदम याच्याशी लढला. त्याने शाहूकडे चिमाजी विषयी तक्रार केली. गुजराथेत यावेळी मोगलाई अधिकारी हमीदखान व सरबुलंदखान यांची

आपापसात घासाघीस होती. त्यात आप्पाने सरबुलंदखानाचा पक्ष स्विकारल्याने त्यांच्या भेटीगाठी साहजिकच होत्या अशातच शाहू छत्रपतींचे चिमाजीला स्वारी लौकर संपविण्याचे आज्ञापत्र आल्याने चिमाजीने ती स्वारी आटोपती घेतली.[४७] तथापी या आटोपत्या घेतलेल्या स्वारीतून पेशव्यांना काहीच मिळाले असे मात्र नाही. सरबुलंदखानाने गुजरातच्या चौथाई सरदेशमुखीचे हक्क सुरतेशिवाय ) करुन दिले. मराठ्यांनी पंचवीसशे फौज गुजरातेत ठेऊन बादशहाच्या शत्रूचा बंदोबस्त करावा आणि त्याबद्दल बादशहाकडून वरील हक्क मिळावा असा हा करार होता. बाजीरावाने पिलाजी गायकवाडाने जर उपद्रव दिला तर त्याच्या बंदोबस्ताची हमी दिली होती. २३-३-१७३० च्या पत्रातील उल्लेख असा ''सरदेशमुखीच्या अमलाविशी गुजरात सुभ्याची पत्रे सरबुलंदखान याची की गुजरातचे चवेचाळीस महाल खंडेराव याजकडून तगीर करुन बाजीराव याजकडे करार केले. हिशेबप्रमाणे देत जावे.''

मराठ्यांना घाबरुन सरबुलंदखानाने मराठ्यांचे चौथाई सरदेशमुखीचे अधिकार मान्य केल्याचे न आवडल्याने त्याने अभयसिंगाला गुजरातवर पाठविले. त्याने सरबुलंदखानास पकडून दिल्लीस पाठविले. चार कोटी रुपये व एक हजार तोफा इतकी लूट अभयसिंगाने केली. रियासतकार म्हणतात'' हिंदुस्थानातील द्रव्याने केवळ मराठ्यांच्याच तोंडाला पाणी सुटले असे नाही. ज्यास सामर्थ्य झाले, त्यावेळी त्याने ते काम केले.''[४८]

वस्तूत: पेशव्यांच्या काळात बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून १७१९ मध्ये परतल्यानंतर नवीन मिळालेल्या हक्कांच्या जोरावर मराठ्यांच्या फौजा निरनिराळ्या प्रदेशात संचार करु लागल्या होत्या. दाभाडे व गायकवाड यांचा संचार गुजराथेत होऊ लागला किंबहुना हे दोघे गुजराथ हे आपल्या पराक्रमाचेच खास क्षेत्र समजत असत. चिमाजी अप्पाने पेटलादवर स्वारी करुन मोगलांना धूळ चारुन खंडण्या वसूल केल्या होत्या. व सोनगडास कायमचे मराठ्यांचे ठाणे तयार केले होते. त्यांच्या या उद्योगात मराठ्यांना गुजरातमधील पटेल वर्गाची मदत मिळत होती.

इ.स. १७२३ मध्ये पिलाजी गायकवाडाने गुजरातेत बऱ्याच स्वाऱ्या करुन बराच वसूल केला होता. २-४-१७२७ रोजी बडोदे गायकवाडांच्या ताब्यात आले. त्यामुळे द.गुजरात मधील सुरत बंदराशिवाय सर्व प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आला.[४९]

तथापी हे सर्व होत असताना गुजरातमधे पेशवा आणि सेनापती यांचे यादवी युध्द घडून आले त्यामुळे मराठ्यांच्या गुजरातच्या साम्राज्य विस्तारावर काही काळ का होईना थोडाफार परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. खंडेराव दाभाडे यास ११-१-१७१७ रोजी शाहूने सेनापतीपद देऊन गुजरात प्रांत सर करण्याचा हुकूम दिला. बाळाजी विश्वनाथ व खंडेराव यांचे एकमत होते. तथापी बाळाजी विश्वनाथाच्या नंतर पेशवेपदावर आलेल्या बाजीरावाबरोबर मात्र त्यांचे सख्य झाले नाही. बाजीरावाने योजलेल्या कामातून तो उत्तरोत्तर अलिप्त राहू लागला. याबाबत शाहूस त्याची अनेकवेळा त्याची कानउघाडणी करावी लागली होती. खंडेरावाचे वय झाल्यामुळे शेवटची पाच सहा वर्षे सेनापतीचे तर्फेने त्याचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे व पिलाजी गायकवाड हेच मुखत्यारीने कामे करित, त्याचे व पेशव्याचे रहस्य कधीच जमले नाही. एकमेकांविषयी मने कलुषित होत गेली. अशातच २७-९-१७२९ रोजी खंडेराव

मुतखड्याचेविकाराने मरण पावला. अल्पावधीतच पुढे त्रिंबकरावाचा आणि बाजीरावाचा बेबनाव सुरु झाला. दोघांना दरबारात बोलावून दोघांच्य तील बेबनाव मिटवावा असा छ.शाहूने प्रयत्न केला. तथापी दाभाड्याने त्यांना साथ न देता उलट निजामाशी संगनमत केले. अशा परिस्थितीत बाजीराव दाभाड्यांची खोड मोडण्यासाठी बाजीराव अधीर होता. पण शाहूने शेवटपर्यंत समेटाचा प्रयत्न केला. पण अखेर व्हायचे तेच झाले. दाभाडे गायकवाड विरुध्द पेशवे यांच्या लढाईला बडोद्याजवळ तोंड फुटले १-४-१७३१ या लढाईत त्रिंबकराव दाभाडे, जावाजी दाभाडे, व मलोजी पवार व पिलाजी गायकवाडचा मुलगा ठार झाला. ती प्रसिध्द लढाई म्हणजेच डभईची लढाई होय.

डभईची ही लढाई निलापूर नजीक झाली असे रियासतकार सांगतात.[५०] तर लढाईचे ठिकाण डभई नसून थवाई होते असे पुरंदरे म्हणतात.[५१] झाला प्रकार छत्रपतींना आवडला नाही. तथापी त्यांनी उमाबाईचे सांत्वन केले आणि यशवंतराव दाभाडे यास सेनापतीचे तर सवाई बाबूराव दाभाडे यांस सेनासरखेलचे पद दिले. उमाबाईचे मनोदयानुसार कारभार झाल्यामुळे तिने आपल्या सरदारास पत्रे लिहिली की, तुरुत ताबाकडे न जाणे. डभईनंतरही ही गुजराथेत पेशव्यांचे हितसंबंध दिसत आहेत. तेव्हा लढाईने त्याने आपला मतलब साधला, हे खास पण छत्रपतींच्या अष्टप्रधानातील सेनापतीपद नावाचेच राहिले व राज्याचे एक अंग लुळे पडले हे मात्र खरे.

मराठ्यांच्या या सेनापतीविरुध्द पेशवा या यादवीच्यावेळी गुजरातवरील मोगल सुभेदार अभयसिंग हा अहमदाबादेस होता. त्याने वरील भांडणाचा फायदा घेऊन डभई व बडोदे भागात मोठी धमाल उडवून दिली. पिलाजी गायकवाडाच्या ताब्यातून बडोदे हिसकावून घेतले व डभईस वेढा घातला. त्याचवेळी शाहू महाराजांच्याकडून अभयपत्रही मिळविले. तहाच्या वाटाघाटीच्या निमित्ताने पिलाजीचा खून करविला. दि. १४-४-१७३२. तथापी पिलाजीच्या लोकांना डभई हातची जाऊ दिली नाही. १९-४-१७३२ रोजी शाहूने दुमाजी गायकवाडाचे पत्र लिहूल समाधान केले. त्यात म्हटले होते,''पिलाजीस घोलसिंगाने दगा केला, त्यामागे तुम्ही हिंमत धरुन अंगेजणी बरीच केली, म्हणून यशवंतराव दाभाडे सेनापतीने लिहिले तरी होणार ती गोष्ट जाहिली. त्याचा अखेर खेद न करणे. तुम्हाविषयी सेनापतीस आज्ञा केली आहे. ते तुमचे उभारणी करुन चालवितील तुम्ही त्यांचे हुकूमाप्रमाणे वर्तणूक करणे.''[५२]

पिलाजीच्या खूनामुळे त्याच्या पुत्रास चेव चढला. त्यांना व दाभाड्यांनी उमाबाईसह अहमदाबादेस वेढा दिला. तेव्हा अभयसिंगाने दमाजी गायकवाडास गुजरातची चौथाई व सरदेशमुखी देण्याचा करार लिहून दिला. व अहमदाबादच्या खजिन्यातून १० हजार रोख मराठ्यांना देण्याचे ठरविले. सन १७३३ मध्ये दमाजीने अभयसिंगाच्या राज्यातील जोधपूरवर हल्ला चढविला. तेव्हा जोधपूरचे रक्षण करण्यासाठी अभयसिंगाला अहमदाबादेहून मारवाडात स्वप्रांती जावे लागले. अभयसिंगाने अहमादाबादवर रतनसिंगाची नेमणूक केली. त्याजवर दमाजीने हल्ला करुन त्याला पळता भुई थोडी करुन सोडले. १७३४ मध्ये दमाजीने बडोद्यावर हल्ला करुन तिथला किल्लेदार शेरखान बावीत यास हुसकावून लाव्ले व बडोदा ताब्यात घेऊन तिथे राजधानी केली.

इ.स.१७२५ मध्येच मराठ्यांनी काठेवाडला प्रथम भेट दिली. पुढील १० वर्षानी म्हणजे १७३५ मध्ये तेथे तुफानी हल्ले करुन भरपूर वसुली केली.

इ.स. १७३७ मध्ये मोमीनखान आणि दमाजी गायकवाड यांचे तुंबळ युध्द होऊन त्यात दमाजीचा विजय झाला. त्यामुळे अहमदाबाद शहराचा निम्मा भाग व संपूर्ण गुजरातचा निम्मा वसूल मराठ्यांना प्राप्त झाला. त्यामुळे १७३७ मध्येच मराठे गुजरातचे सर्व सत्ताधीश झाले व मोगल नावालाच उरले.

अशा प्रकारे गुजराथवरील मोगलांची सत्ता मराठ्यांनी हिसकावून घेतली. त्यांचा उपभोग पेशवे, गायकवाड घेऊ लागले.[५३] अशाप्रकारे गुजराथेत मराठ्यांचा साम्राज्य विस्तार झाला.

**<u>बुंदेलखंड</u> –**

प्रस्तुत कालखंडात बुंदेलखंड मध्यप्रदेशात समाविष्ट आहे. पूर्वेला विंध्य पर्वताची श्रेणी, पश्चिमेला चंबळ नदी, दक्षिणेला नर्मदा व उत्तरेला यमुना ह्या त्याच्या भौगोलिक सीमा होत. बुंदेलखंडाचा बहुतांश प्रदेश पहाडी आहे. बुंदेले राजपूत यांच्या नावावरुन या प्रदेशाला बुंदेलखंड हे नांव पडले. पूर्वी त्याला चेद्दी देश म्हटले जात असे.मौर्याच्या काळात हा प्रदेश मौर्य साम्राज्याचा एक भाग होता. त्यानंतर शुंग आणि पुढे गुप्तांची सत्ता तेथे स्थापन झाली. गुप्तांनंतर हर्षवर्धनाची सत्ताही या प्रदेशाने पाहिली. इ.स.च्या सातव्या शतकापासून कलचुरींची कारकीर्द सुरु झाली. तर इ.स. च्या ११ व्या शतकाच्या अखेरीस चंदेलांनी हा प्रदेश जिंकून घेतला.

इ.स.१६ व्या शतकात बुंदेले राजपूत हे या प्रदेशाचे सत्ताधारी बनले. हे लोक काशीच्या राजवंशातील (गाहडवाल) पंचम नामक पुरुषाचे वंशज होते.

इ.स. १५०७ मध्ये बुंदेलखंडाचा राजा रुद्र प्रताप झाला तर त्यानंतर किरतसिंह गादीवर आला.[५४]

सम्राट अकबर आणि शहाजहान यांच्या काळात बुंदेलखंडावर आक्रमणे होत होती. परंतु शिवाजीच्या मावळ्यांप्रमाणे बुंदेले राजपूतांनी डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घेऊन मोगली फौजेस जर्जर केले.

औरंगजेबाने या गोष्टीचा सूड उगवण्यासाठी चंपतराय बुंदेल्यावर स्वारी केली. त्यात तो मरण पावला. त्याच्या राणीने आत्मत्याग केला. चंपतरायाचा मुलगा छत्रसाल आणि मराठे यांचा अठराव्या शतकात प्रत्यक्ष संबंध आला. मराठ्यांनी बुंदेलखंड आपल्या अमलाखाली आणण्याचा प्रयत्न केला. तथापी छत्रसाल हा चंपतरायाचा मुलगा बुंदेलखंडात स्वातंत्र्याकरिता कसा लढत होता व त्याला मदत करण्यासाठी बाजीराव पुढे कसा गेला अशा क्रमाने हा इतिहास पाहता येईल.

छत्रसालचा जन्म २६-५-१६५० चा रोजी झाला. स्वदेशाचे स्वातंत्र्य स्थापन करण्यात देह झिजविण्याचा त्याने संकल्प केला. दक्षिणेत १६६५ मध्ये तो आला तेव्हापासून शिवाजीचे पराक्रम ऐकून त्याला नवी स्फूर्ती उत्पन्न झाली आणि मोगलांची चाकरी करण्याऐवजी त्यांचेविरुध्द आपले क्षात्रतेज गाजविण्याचा त्याने निश्चय केला. एकेदिवशी

शिकारीस जाण्याचे निमित्त करुन तो शिवाजीकडे आला. दोघांच्या भेटी झाल्या. बुंदेल्यांनी उत्तरेस व मराठ्यांनी दक्षिणेत एकदम उठाव केल्यास मोगलांना हार खावी लागेल अशी मसलत ठरली.

छ.शिवाजी महाराजांकडून स्फूर्ती घेवून त्याने बुंदेलखंडात मुसलमानांबरोबरच्या युध्दात विजय मिळविले. मराठ्यां प्रमाणेच त्याने जिकडे तिकडे चौथाई वसूल करण्याचा प्रघात घातला. अल्पावधीतच सर्व बुंदेलखंडावर त्याची निष्कंटक सत्ता सुरु झाली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र बहादूरशहा याने छत्रसालचे स्वातंत्र्य कबूल केले. मराठ्यांचा प्रवेश छत्रसालच्या मार्फतच झाला.[५५] नेमाजी शिंद्याच्या नेतृत्वाखाली माळव्यात मराठे लढत असताना (इ.स.१७०४) अयशस्वी ठरले त्यावेळेसच ते बुंदेलखंडाकडे जात असता गाजीउद्दीन फिरोजजंगने त्यांचा पराभव केला.

इ.स.१७०६-२२ या काळात गुजरातवर दहा सुभेदार नेमले गेले. प्रत्येक सुभेदारास स्वत:ची शाश्वती नसल्याने राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करीत. शिवाय लोकांकडून बळेच नजराणे वसूल करीत. त्यामुळे लोकही मोगलांच्या सत्तेस विटले. त्यांनीमराठ्यांना आपल्यावर राज्य करण्यास वाव दिला. याचा परिणाम असा झाला की, माळव्याप्रमाणेच बुंदेलखंडातील प्रमुखांनी मराठ्यांची मदत मागितली. अशारितीने बुंदेलखंडात मराठ्यांचा अंमल सुरु झाला.

इ.स.१७२२ मध्ये बाजीरावाने माळवा जिंकण्याच्या उद्योग केला. त्यावेळेस मराठ्यांनी बुंदेलखंडापर्यंत स्वारी करुन खंडण्या वसूल केल्या.

अशावेळेस मराठे व छत्रसाल यांच्या एकीमुळे कदाचित माळवा हातचा जाईल व दिल्लीसुध्दा काबीज करण्यास मराठे व छत्रसाल कचरणार नाहीत हे ओळखून मराठे व छत्रसाल यांचे पारिपत्य करण्यासाठी बादशहाने महंमदखान बंगशची नेमणूक केली.[५६]

त्यानंतर साहजिकच १७२८ मध्ये छत्रसाल व बंगश यांचे निकराचे युध्द झाले. छात्रसाल पराभूत झाला. बंगशला शरण गेला.[५७] बंगशने छत्रसाल आणि त्याची मुले यांना मराठी फौजा कायमखानावर चालून गेल्याची संधी साधून महंमदखानाने छावणी सोडून किल्ल्याचा आश्रय घेतला. पण त्यास काहीच फायदा झाला नाही. दिल्लीहून मदत येईपर्यंत किल्ला निकराने लढवायचा असा महंमदखानाने निर्धार केला. किल्ल्यात तर धान्याचा कण उरला नव्हता. बाहेरील सर्व मार्ग मराठे व बुंदेल्यांनी अडविलेले. धान्य रुपयास शेर व तेही मिळेनासे झाले. पठाणांनी तोफांचे बैल मारुन खाल्ले. शरण येण्यावाचून गत्यंतर नाही इतकी हालाखीची स्थिती पेशव्याने बंगशची करुन टाकली.[५८]पावसाळ्याआधी दक्षिणेत पोहोचायची निकड असल्याने उरलेली कामगिरी छत्रसालवर सोपवून पेशव्याने दक्षिणेस प्रयाण केले. जैतपूरचा वेढा पुढे निकराने चालवून छत्रसालने बंगशास बुंदेलखंडातून घालवून दिले.

जैतपुरावर मार खावून महंमदखान बंगश दिल्लीस परतला. तेथे बुंदेलखंडात पराभव पावल्यामुळे अलाहाबादच्या सुभ्यावरुन आपली उचलबांगडी झाल्याचे त्यास समजले. पण माळव्याच्या सुभेदारीवर त्याची नेमणूक झाली. अशारितीने छत्रसालची सुटका बाजीरावाने केली. सन १७३१ च्या १४ डिसेंबरला वयाच्या ८२ व्या वर्षी छत्रसाल

मरण पावला. आपल्या हाकेस धावून येवून आपले रक्षण पेशव्याने केले याचे स्मरण ठेवून मृत्युसमयी आपल्या राज्याचा तिसरा भाग पेशव्यास मिळावा अशी व्यवस्था छत्रसालने केली.

रियासतकार सरेदसाई बुंदेलखंड प्रकरणावर भाष्य करताना म्हणतात, ''हे एकंदर प्रकरण म्हणजे मराठे व रजपूत यांचे मोगल बादशाहीविरुध्द धर्मयुध्दच होते. लोक वार्तेत तरी बाजीरावाला हिंदूंचा पुरस्कर्ता हे नांव मिळाले.''[५९] तथापी डॉ.दिघे, प्राचार्य आठवले इ. आधुनिक इतिहासकारांना हे मत मान्य नाही. डॉ.दिघे म्हणतात, ''जयपूर, जोधपूर, उदेपूर, बुंदेले यांच्याकडे मराठ्यांनी चौथ सरदेशमुखीची मागणी करावयाची व राजे रवजड्यांनी याबाबत खळखळ करावयाची हे काय मैत्रीचे द्योतक का हिंदू संघटनेचे? सर्व राजेरजवाड्यांनी मैत्रीच्या नात्याने त्यांचा संघ बनविला आहे. त्यांनी मिळून पातशाहीचा कारभार कोणत्या धोरणावर चालववयाचा आहे, परस्परांचे संबंध कसे असावे यासंबंधी विवेचन तत्कालीन कागदपत्रात मिळत नाही, तोपर्यत बाजीराव पेशव्याच्या हिंदुधर्माच्या आस्थेबद्दल मुग्धताच पाळलेली बरी. गोब्राह्मण प्रतीपालक, काशीप्रयाग तिर्थे सोडविणे या निव्वळ घोषणा होत. सर्व हिंदू सत्ताधीशांची मुसलमानांच्या विरुध्द एकजुट असल्याचा देखावा अठराव्या शतकात तरी दिसत नाही.''[६०]

आठवले म्हणतात, ''मराठे हिंदूंच्या रक्षणासाठी कटीबध्द होते असे म्हणावे तर तिचा अर्थ समजणे कठीण आहे. मराठ्यांच्या स्वाऱ्यांमुळे हिंदूप्रजाही त्रस्त होत होती.''[६१]

डॉ.व्ही.एस.कदम यांनीही मराठी रियासतीच्या चौथ्या खंडाचे संपादन करुन त्याला जी प्रस्तावना लिहीली आहे त्यात रियासतकारांच्या हिंदू पतपातशाहीच्या धोरणाला लंगडे समर्थन असे म्हटले आहे.[६२]

इ.स. १७३२/३३ मध्ये चिमाजी अप्पाने बुंदेलखंडात स्वारी केली. तेव्हा त्याने तिकडील प्रदेशाची व्यवस्था करण्यासाठी गोविंदपंत बुंदेल्यांची नेमणूक केली. बाजीरावाला ही बुंदेलखंडात पुष्कळसा मुलुख मिळाला. बाजीराव आणि छात्रसालच्या मुलांनी एकमेकांशी करार करुन एकमेकांना मदतीची आश्वासने दिली. पण छत्रसालच्या पश्चात बुंदेलखंड पेशव्याच्या ताब्यात आलाच नाही. दरसाल सात लाख खंडणीमात्र मिळे आणि तीही बहुधा फौजबंद सरदार पाठवून वसूल करावी लागे. बुंदेलखंडाच्या बऱ्याचशा भागावर मालकी प्रस्थापित करण्याचे काम बाजीरावाचा मुलगा नानासाहेब याने केले. त्याची थोडक्यात हकीगत अशी. इ.स. १७४२ मध्ये माळव्याच्या सुभेदारीचे राजकारण करीत असतानाच नानासाहेब पेशव्याने आपले सरदार बुंदेलखंडात खंडणी वसूल करण्याकरता पाठविले. पण मराठ्यांना खंडणी न मिळता उलट मराठ्यांच्या छावणीवर हल्ला चढवून मल्हार कृष्ण व जोत्याजी शिंदे ह्यांची डोकी कापून नेली. नानासाहेबाने याचा पुढे पुरेपूर सूड घेतला. औच्छांच्या राजाला कैद करुन त्याच्या राजधानीवर नांगर फिरविला (गाढवाचा). नारो शंकर याने झाशीचा किल्ला ताब्यात घेतला. १७४६/४७ पासून पेशव्याने स्वताऱ्यात राहून बुंदेलखंडाचा जेवढा भाग जिंकला होता. त्याची व्यवस्था लावून दिली. शिंदे होळकरांनी बुंदेलखंडातील जैतपूर हे ठाणे काबीज केले. दतियाचा बंदोबस्त करता आला. इ.स.१७४७ साल उजाडण्या पूर्वी बुंदेल्याच्या प्रमुख सत्ताधाऱ्यांशी करार मदार करण्यात आले. प्रा.सदाशिव आठवले बुंदेलखंड प्रकरणावर भाष्य करताना म्हणतात, ''एकंदरीत संपूर्ण

बुंदेलखंड मराठ्यांच्या अंमलाखाली आला नसला तरी काही भागावर त्यांची स्पष्ट मालकी तर उरलेल्या भागावर त्यांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले यात शंका नाही. बाजीरावाने सुरु करुन सोडून दिलेले राजकारण त्याच्या पुत्राने चार पावले पुढे नेले. एवढे निश्चित म्हणता येईल.''[६३]

डॉ.दिघे लिहीतात, ''शिवाजी जर स्वराज्य संस्थापक तर बाजीरावास साम्राज्य संस्थापक म्हणावयास हरकत नाही. स्वकीयांचा विरोध, दरबारी अडथळे, निजामाची कारवाई या सर्वांस तो पुरुन उरला. माळवा बुंदेलखंडात या पुरुषाने मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली. पानीपतच्या पराभवानंतर पंजाब, आकबराबाद व दुआब यातून मराठे मागे हटले, पण माळवा, बुंदेलखंडात कायम राहिले. यातच बाजीरावाने उभारलेल्या इमारतीच्या स्थैर्याची साक्ष आहे.''[६४]

एकंदरीत गुराजथच्या बाबतीत शिवाजीने साम्राज्यवादी धोरण स्वीकारले ते पेशव्याने पूर्ण केले. माळव्यात राजारामाच्या काळात साम्राज्यवादाला सुरुवात झाली. तेथेही पेशव्यानेच जम बसविला तर बुंदेलखंडात बाजीरावाने राजकारण सुरु केले. त्याच्या मुलाने ते पूर्णत्वास नेले हेच खरे.

# संदर्भ टीपा

१) मराठी विश्वकोश खंड १३, पृ. ४८४-५

२) मु.रि., खंड २, पृ. ९६-७,

३) मराठी विश्वकोश, उपरोक्त पृ. ४८५

४) भारतीय संस्कृतीकोश खंड ७, पृ. ३६३-४

५) राजवाडे, म.इ.सा.खंड ५, लेख ६

६) Dr.Sulochana Joshi, Studies in Maratha History, May 1979 p. 1-3

७) History of Aurangazeb. Vol. V, p. 382

८) म.रि. खंड ३, पृष्ठ ३१६

९) पगडी, मो.म., पृष्ठ १४३
मो.द.बा. खंड १, प्रस्तावना, पृष्ठ ३०

१०) पगडी, कित्ता, प्रस्तावना पृष्ठ २२

११) श्रीमंत धारकर पवारांच्या इतिहासाची साधने, लेखांक १, पृष्ठ २

१२) सरकार आणि सरदेसाई राजारामाच्या मृत्यूची तारीख, २ मार्च १७०० अशी देतात तर गदाधर प्रल्हाद शकावलीच्या आधारे ती तारीख ३ मार्च असल्याचे डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात.
पहा-म.रि. खंड २, पृष्ठ २५१-५२

१३) मा.वि.गुजर, पवार घराण्याचा इतिहास, पुणे १९५९, पृ. २१-२४ (दु.आ.)

१४) पगडी, मो.म.सं., पृ. १२१

१५) मो.म., पृ. १७२

१६) जयसिंगराव पवार, महाराणी ताराबाई, कोल्हापूर १९७५, पृ. २०९

१७) पगडी, मो.म., पृ. १५७

१८) म.रि., खंड ३, पृ. २९

१९) श्रीमंत धारकर पवारांच्या इतिहासाची साधने, लेखांक २, पृ. ४

२०) कित्ता, पृ. १७

२१) पे.द., खंड १३, लेख १८

२२) कित्ता, लेख १९

२३) कृ.वा.पुरंदरे, चिमाजी आप्पा पेशवे यांचे चरित्र, पुणे १९४५, पृ. ६-११

२४) पे.द., खंड १३, लेख १७

२५) कित्ता, खंड ३०, लेख २८७

२६) कित्ता, खंड १२, लेख १५

२७) कित्ता, लेख १७, २३, २५, ३८, ४८

२८) पुरंदरे, उपरोक्त, पृ.१८-१९

२९) पुणे पूराभि लेखागारातील अप्रकाशित कागदपत्रे, दफ्तर क्र.३, पुडकी क्र.२, पत्र क्र.१५१६

३०) शा.रो. पृष्ठ २१

३१) पे.द., खंड १७, लेख ३०

३२) श्रीमंत धारकर पवारांच्या इतिहासाची साधने, पृ. ४४, तळटीप

३३) पे.द., खंड २२, पृ. १६३

३४) गो.स.सरदेसाई कराराची तारीख ७ जानेवारी १७३८ अशी देतात. खरे जंत्रीनुसार ती तारीख ६ डिसेंबर १७३८ अशी येते. पहा - म.री., खंड ३, पृ. ५२४

३५) अ.रा.कुलकर्णी आणि ग.ह.खरे (संपा), मराठ्यांचा इतिहास, खंड २, पृ. ६५

३६) भारतीय संस्कृती कोष, खंड ३, पृ.३५

३७) मराठी विश्वकोष, खंड ५, पृ. ५९

३८) म.री., खंड १, पृ.२१६

३९) वा.सि.बेंद्रे, छ.शिवाजी महाराजांचे चरित्र, मुंबई १९७२, पृ. ३७३

४०) सेतुमाधवराव पगडी, शिवचरित्र एक अभ्यास, कोल्हापूर १९७१, पृ.५२

४१) जयसिंगराव पवार, मराठी सत्तेचा उदय, मुंबई १९७९, पृ. १३९

४२) वि.गो.खोबरेकर, गुजरातेतील मराठी राजवट, पुणे १९६२, पृ.८

४३) सेतुमाधवराव पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २६१

४४) कित्ता, पृ. २८५

४५) सेतुमाधवराव पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द, पृ.८३

४६) V.G.Dighe, Bajirao and Expansion of Maratha, p.22

४७) पुरंदरे, उपरोक्त पृ.२१-४

४८) म.री., खंड ३, पृ. ३७८

४९) खोबरेकर, उपरोक्त, पृ. १५-३३

५०) म.री., खंड ३, पृ. ३८८

५१) पुरंदरे, उपरोक्त, पृ. ४५

५२) म.री., खंड ३, पृ. ३९९

५३) खोबरेकर, उपरोक्त, पृ. ४२-८

५४) भारतीय संस्कृती कोष, खंड ६, पृ. १९१-९२

५५) मु.री., खंड २, पृ. २७२-६

५६) महंमद खान बंगश - बादशाही फौजेतील पराक्रमी वीर, त्याने छत्रसालवार हल्ला केला. तेव्हा छत्रसालने बाजीरावाकडे मदत मागितली. बाजीरावाने ती देऊन बंगशचा पराभव केला.

५७) वि.गो.दिघे, मराठ्यांच्या उत्तरेतील मोहीमा, पुणे १९३३, पृ. १७

५८) पे.द., खंड १३, लेख ४५

५९) म.री., खंड ३, पृ. ३७७

६०) कुलकर्णी आणि खरे, उपरोक्त, पृ. ७७-७८

६१) म.री., खंड ३, विभाग संपादकांचे मनोगत, पृ. २१०-११

६२) कित्ता, खंड ४, विभाग संपादकांचे मनोगत, पृ. १२

६३) कुलकर्णी आणि खरे, उपरोक्त, पृ. ९२-९३

६४) वि.गो. दिघे, उपरोक्त, पृ. ७९